दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184
नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ वे | अंक : ३३ वा | शुक्रवार दि. ८ डिसेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

**न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे**

धुळे - नागपूर, अमरावती, अकोला
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.
2x1 A/C स्लीपर कोच
लगेज व पार्सलची उत्तम व्यवस्था
डेली सर्व्हिस - सांगली, सातारा, कोल्हापूर
वेळ - १०:३० ते १०:४५ पर्यंत
संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
द.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

धुळे । तालुक्यातील काळखेडा येथील परमेश्वर राजाराम पाटील याने सोशल मीडिया फेसबुकवर आक्षेपार्ह पोस्ट टाकून दोन समाजात तेढ निर्माण केली, अशी तक्रार प्रा. डॉ. नागसेन बागुल यांनी दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून परमेश्र्वर पाटील याच्या विरोधात धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

सिडको । महामार्ग ओलांडताना अज्ञात वाहनाच्या धडकेत एका अज्ञात ४५ वर्षांच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना अंबड पोलीस ठाणे हद्दीत इंदिरानगर बोगद्याजवळ एका हॉटेलच्या समोरील महामार्गावर घडला. याबाबत अंबड पोलीस ठाणे हद्दीत इंदिरानगर बोगदा जवळ एका हॉटेलच्या समोरील महामार्गावर अंदाजे ४५ वर्षे वयोगटातील पुरुषाला रस्ता ओलांडत असतांना भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने उडवल्याने सदरहू व्यक्ती जखमी झाले. त्यांना रुग्णवाहिकेने जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. कुणाला अशा व्यक्तीची माहिती असल्यास त्यांनी अंबड पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन वरिष्ठ निरीक्षक प्रमोद वाघ,पोलीस नाईक के.डी. आवारे यांनी केले आहे.

# वाढीव घरपट्टी विरोधात राष्ट्रवादीचा मोर्चा

धुळे । प्रतिनिधी

महापालिकेने धुळेकर नागरिकांना वाढीव घरपट्टी आकारण्याचा सपाटा लावला आहे. वाढीव कराच्या नोटीस हातात पडल्यानंतर धुळेकरांच्या पायाखालची वाळू सरकत आहे. शहरात सोयी-सुविधांची बोंब असताना मनपा अवाजवी कर आकारतेच कशी? असा संतप्त सवाल धुळेकरांमधून उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागीरदार यांच्या मार्गदर्शनातव जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांच्या नेतृत्वात धुळे महापालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला.

वाढीव घरपट्टी रद्द झालीच पाहिजे, अशी आग्रही मागणी या मोर्चाद्वारे करण्यात आली. तसेच मनपाने वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस मागे न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला. दरम्यान, धुळेकरांच्या बाजुने राष्ट्रवादी काँग्रेस मैदानात उतरल्याने धुळेकरांमधून इर्शादभाईंसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या आक्रमक भुमिकेचे



कौतुक होत आहे.

यावेळी प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागीदार, जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी व पदाधिकार्यांनी मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांची दालनात भेट घेवून निवेदन दिले. तसेच मनपाकडून धुळेकरांवर होत असलेल्या अन्यायाबाबत चर्चा केली. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील नागरिकांना महापालिकेने वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस बजावण्याचा सपाटा लावला आहे. शहरातील नागरिकांना मुलभूत नागरी सुविधा अर्थात पाणी, लाईट, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण रस्ते यापासून वंचित ठेवण्यात आले आहे. नागरिकांचे पिण्याचे पाणी आठ-आठ दिवस मिळत नाही. बंद पथदिव्यांमुळे अनेक भागात अंधाराचे साम्राज्य असते. मनपा शाळा मोडकळीस आल्या आहेत. कचरा संकलन करणार्या गाड्याही नियमित येत नाहीत. या प्रश्नांकडे मनपाने सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहेत. शहरातील एकही रस्ता चालण्यायोग्य नाही. कचर्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय मनपाच्या दवाखान्यांमध्ये डॉक्टर व कर्मचार्यांअभावी आरोग्य व्यवस्था ढासळली आहे. मनपाच्या अशा कारभारावर धुळेकर जनता अगोदरच प्रचंड नाराज आहे. असे असताना मनपाने आता वाढीव मालमत्ता कर आकारुन कहर केला आहे. मनपाचा हा प्रकार म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासाखा आहे

सदर मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागीरदार, शहर जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांच्यासह शहराध्यक्षा जयाताई साळुंके, राजेंद्र चितोडकर, ओबीसी सेलचे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर माळी, गोपाल देवरे, पै.रविंद्र आघाव, संजय जगताप, एजाज शेख, निशा अहिरे, संगीता खैरनार, शिलाताई बैसाणे, ज्योती मरसाळे, सुदर्शना बाविस्कर, संगिता बोरसे, निता पाटील, अशोक करंजे, ज्ञानेश्वर पाटील, अरुण पाटील, जयेश पाटील, विशाल केदार, राजन शिरसाठ, किशोर थोरात, वंदना केदार, सुरेश अहिरे, के. एस.चौधरी, रंजना निकुंभ, उमेश महाजन, कुणाल पवार, पीर मो. रईस शाह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**तीव्र आंदोलन करणार!**

**महापालिकेने वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस तात्काळ मागे घ्याव्यात तसेच जुन्या दराप्रमाणेच मालमत्ता कराची आकरणी करावी, तसेच नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.**

# बनावट कागदपत्रे करून प्रॉपर्टी विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

धुळे । प्रतिनिधी

धुळे शहरात बनावट कागदपत्रे तयार करून प्लॉट खरेदी विक्रीचा काळाबाजार सुरु होता. हा प्रकार करणारी टोळी सक्रिय झाली होती. परंतु धुळे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने हा प्रकार उघडकीस आणला असून यासंदर्भात पथकाने दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने भूखंड हडपणार्या टोळीचा एलसीबीने छडा लावला आहे. जेबुनिशा मोहम्मद शफी (७०), रा. नर्वे मार्केट, मानव मंदिर मागे, रावतभाटा, चितोडगड (राजस्थान) यांच्या नावावर देवपूर भागात स.न.७४/१ ब/१ क मधील प्लॉट नं. ३२ सि.स. नं. क्षेत्र १०३ चौ. मी. व स.न. ७४/१ ब / १ क मधील प्लॉट नं. १२ क्षेत्र ७५.६० चौ. मी. असे दोन भूखंड होते. ते त्यांनी १९८७/८८ मध्ये खरेदी



केले होते. प्लॉट मालकांना अंधारात ठेवून अमोल अशोक मोरे व इरफान रऊफ पटेल यांनी जेबुनिशा शफी यांच्या नावे बनावट आधार कार्ड व इतर कागदपत्रे तयार केलीत. त्याद्वारे दोन्ही प्लॉटची खरेदी-विक्री करण्यात आली. सदर फसवणुकीचा प्रकार लक्षात आल्यानंतर श्रीमती शफी यांचा मुलगा मोहम्मद शरीफ मोहम्मद शफी (५२) यांनी धुळे पोलिसांकडे धाव घेतली. सदर घटनेचे गांभीर्य ओळखून एसपी श्रीकांत धिवरे यांनी एलसीबीचे पीआय दत्तात्रय शिंदे यांना ताबडतोब कारवाईच्या सुचना केल्यात. त्यानुसार एलसीबीने अमोल मोरे व इरफान रऊफ पटेल यांना अटक केली आहे. पोलिसांनी अमोल अशोक मोरे , इरफान रऊफ पटेल, शेख अजीज शेख भिकारी, बिलकीसबी सरफूद्दीन शेख, रामचंद्र वामन अहिरे, सुशील प्रेमचंद जैन, रहाणारी तोतया महिलेच्या विरूद्ध दाखल केला आहे. सदरची कारवाई एसपी श्रीकांत धिवरे, एएसपी किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पीआय दत्तात्रय शिंदे, पीएसआय प्रकाश पाटील, एएसआय शाम निकम, पोहेकॉ. संदीप पाटील, पोहेकॉ. रविंद्र माळी, सुरेश भालेराव, पोना. रवीकिरण राठोड, पोकॉ. सुशील शेंडे, निलेश पोतदार, हर्षल चौधरी, गुणवंतराव पाटील यांनी केली.

# चौकशी झाल्याशिवाय ठेकेदाराला बिले अदा केली जावू नयेत : सुनिल बैसाणे

धुळे । प्रतिनिधी

वरखेडी रोडवरील कंपोस्ट डेपोतील सीसीटिव्ही कॅमेरे टेंडर निघाल्यानंतर काही दिवसात बंद पडले आहेत. ही बाब संशयास्पद असून सर्व बिलांची चौकशी झाल्याशिवाय ठेकेदाराला बिले अदा केली जावू नयेत, अशी मागणी सदस्य सुनिल बैसाणे यांनी आजच्या स्थायी समितीत केली.

सभेला अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त संगिता नांदुरकर, कर मुल्य निर्धारण अधिकारी पल्लवी शिरसाठ, नगरसचिव मनोज वाघ यांचेसह सदस्य सुनील बैसाणे, नरेशआप्पा चौधरी, हर्षकुमार रेलन, साबीर शेख, वसीम बारी, नाजीया पठाण आदी सदस्यांची उपस्थिती होती. विषय पत्रिकेवरील विषय मंजुर करण्यापुर्वी अनुपस्थित सदस्यांवर कारवाईचे सभापतींनी आदेश दिले. तर प्रलंबित प्रश्नांमध्ये हर्षकुमार रेलन व नरेश चौधरी यांचे प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याचे नगर अभियंता कैलास शिंदे यांनी सांगितले. स्थायी समितीच्या सभेत सदस्य सुनील बैसाणे यांनी काही सुचना व तक्रारी मांडल्या. यात नकाणे तलावातील पाणी पातळी कमी झाली आहे. भविष्यात तापी पाणीपुरवठ्यावर अवलंबुन रहाण्याची वेळ येवू नये याकरीता नकाणे तलावातील गाळ काढण्यात यावा व याकामी स्थानिक शेतकर्यांना गाळ नेण्यासाठी आवाहन करण्यात यावे, ही सुचना मांडली. तर शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका ज्या स्वयंभु कंपनीकडे दिला आहे, त्या ठेकेदाराला आजवर किती बिले दिली? त्या प्रत्येक बिलाची माहिती मला देण्यात यावी, अशी मागणी केली.

# चौथ्या औद्योगिक क्रांतीत एमएससीआयटी प्रभावी माध्यम: वीणा कामत यांचा विश्वास

धुळे । प्रतिनिधी

चौथी औद्योगिक क्रांती सामाजिक, राजकीय ,सांस्कृतिक आणि आर्थिक उलथापालथींची मालिका दर्शविते. चौथी औद्योगिक क्रांती मोठ्या प्रमाणात डिजिटल,जैविक आणि भौतिक नवकल्पनांच्या अभिसरणाने चालविली जाईल. चौथी औद्योगिक क्रांती ही भविष्यवाणी नसून कृतीची मागणी आहे. सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अधिक सशक्त, सहयोगी आणि शाश्र्वत पाया वाढविणारे, मानवी सन्मान आणि इतर सामायिक मूल्यांभोवती बांधले गेलेले तंत्रज्ञान विकसित करणे, प्रसार करणे आणि नियंत्रित करणे ही एक दृष्टी आहे. संगणक साक्षरतेतून सक्षमतेकडे जाण्याचा विश्वास एमकेसीएलच्या मुख्य व्यवस्थापिका




वीणा कामत यांनी व्यक्त केला.


महाराष्ट्र ज्ञान महामंडळाकडून विद्यार्थ्यांना इंडस्ट्री रेडी व अधिक सक्षम करण्यासाठी संगणक ज्ञान देणारे विविध स्किल दिली जातात. कौशल्य आणि कार्यबल विकास योग्यरीत्या पूर्ण केल्याावर कौशल्य विकासमुळे बेरोजगारी कमी होऊ शकते, उत्पादकता वाढू शकते, जीवनमान सुधारू शकते. नोकर्यांसाठी लोकांना अपस्किलिंग किंवा रिस्किलिंगमध्ये गुंतवणुक केल्याने आर्थिक अर्थ प्राप्त होतो.

# सरपंच, ग्रामसेवकासह चौघांवर गुन्हा

धुळे । प्रतिनिधी

लाभार्थ्यांच्या वैयक्तिक शौचालय अनुदानात दहा लाखांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी विटाई (ता. साक्री) येथील तत्कालीन सरपंच, ग्रामसेवकासह चौघांवर साक्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ८४ लाभार्थ्यांचे वैयक्तिक शौचालय अनुदान नियमबाह्य पद्धतीने ठेकेदाराला वाटप करून शासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

हर्शल दर्यावगीर महंत (रा. १०९, विनोदनगर, वलवाडी, देवपूर, धुळे) यांनी फिर्यादीत म्हटले आहे, की विटाई (ता. साक्री) ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच भीमराव भास्कर खैरनार, वकील मोतीलाल खैरनार, तत्कालीन निलंबित ग्रामसेवक रवींद्र सदाशिव वाघ व कर्मचारी युवराज हिराजी भामरे यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)अंतर्गत विटाई ग्रामपंचायतीला २०१६-१७ ते २०२०-२१ या आर्थिक वर्षात




एकूण ३२६ लाथार्थ्यांना प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यासाठी ३९ लाख १२ हजार रुपये अनुदान पंचायत समिती स्तरावरून वितरित झाले. हे अनुदान संबंधित लाभार्थ्यांना रेखांकित धनादेशाद्वारे वितरित करण्याबाबत स्पष्ट निर्देश होते. तरीही अनुदान लाभार्थ्यांना धनादेशाद्वारे अदा न करता संबंधित ठेकेदाराला मोठ्या रकमा अदा करून ग्रामपंचायतीने ८४ लाभार्थ्यांचे सुमारे दहा लाख आठ हजारांचे अनुदान नियमांचे पालन न करता गंभीर स्वरूपाचा आर्थिक व्यवहार करत आर्थिक अनियमितता केली. त्यावरून साक्री पोलिस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल झाला.

# ७ लाखांच्या गुटख्यासह २२ लाखांचा ऐवज जप्त

सोनगीर । प्रतिनिधी

राज्यात प्रतिबंधित असलेला सुमारे सात लाख रुपये किमतीचा पानमसाला व गुटखा येथील पोलिसांनी पकडला असून, गुटखा वाहतूक करणाऱ्या कंटेनरसह २२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

विविध कंपन्यांचा पानमसाला व गुटख्याच्या गोण्या भरलेले ३२ बॉक्स आढळले. सुमारे सहा लाख ६१ हजार ३२० रुपयांचा गुटखा व १५ लाख रुपयांचा कंटेनर असा एकूण २१ लाख ६१ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनेबाबत अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना



कळविण्यात आले असून, त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल होईल. तशी कारवाई सुरू आहे. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी येथील पोलिस ठाण्यास भेट देऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. ही कारवाई धुळे जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन कापडणीस, सहाय्यक उपनिरीक्षक किरण राजपूत, हवलदार संजय देवरे, नरेंद्रसिंग गिरासे, पोलिस नाईक अमरिश सानप, राहुल पाटील, विजयसिंग पाटील यांनी केली. सहाय्यक पोलिस निरीक्षक कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## नवाब मलिक महायुतीत नको:फडणवीसांचे अजित पवारांना पत्र

मुंबई । जामिनावर असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नवाब मलिक हे आज अजित पवार गटात सहभागी होत सत्ताधारी बाकावर बसले. मलिक हे सत्ताधारी बाकांवर बसल्याने भाजपवरही टीका होऊ लागली असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना पत्र लिहित विरोध केला आहे. सत्ता येते जाते, पण देश महत्वाचा. त्यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली होती. त्यामुळे त्यांना महायुतीमध्ये सामावून घेता कामा नये असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# आ. कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नामुळे रस्ते व पुलांच्या कामासाठी २० कोटी मंजुर

धुळे । प्रतिनिधी

धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघाची विकासाची घोडदौड कायम ठेवत आ.कुणाल पाटील यांनी आतापर्यंत विविध विकास कामांसाठी करोडो रुपयांचा विकास निधी मंजुर करुन आणला आहे. त्यातून सिंचनासह रस्ते,पुल,आरोग्य अशी मुलभूत विकासाची कामे उभी केली आहेत. त्याअनुषंगाने धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नाने धुळे तालुक्यातील पुलांच्या व रस्त्यांच्या कामासाठी तब्बल २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यात बोरी नदीवरील धामणगाव आणि मांडळ येथील दोन पुलांच्या कामाचा समावेश आहे.

धुळे ग्रामीणचे कार्यसम्राट आमदार कुणाल पाटील यांनी नेहमीच विकास कामांना प्राधान्य देत मतदार संघातील प्रत्येक गावात विकासाचे काम पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. धुळे तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी रस्ते आणि पुलांच्या कामांना गती देत आवश्यक त्या ठिकाणी पुलांची मंजूर केले, त्यामुळे शेतकरी,ग्रामस्थ व वाहनधारकांची गैरसोय दूर होत आहे. नागपुर येथे सुरु झालेल्या हिवाळी अधिवेशनाच्या अर्थ संकल्पीय पुरवणी यादीत आ.कुणाल पाटील यांचे विशेष प्रयत्न व शिफारशीनुसार धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील पुल आणि रस्त्यांच्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. बोरी नदीवरील धामणगाव आणि मांडळ-होरपाडा पुलांमुळे तसेच इतर मंजुर रस्त्यांमुळे शेतकरी,ग्रामस्थ व वाहनधारकांची गैरसोय दूर



होणार असून आ.कुणाल पाटील यांनी मंजुर केलेल्या रस्त्यामुळे धुळे तालुक्यातील रस्ते चकाचक होणार आहेत.आ.कुणाल पाटील यांनी विकासची कामे मंजुर केल्याबद्दल मतदासंघातील जनतेने समाधान व्यक्त केले आहे.दरम्यान रस्ते व पुलांना मंजुरी मिळवून देत निधीची तरतूद करुन दिल्याबद्दल आ.पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रविंद्र चव्हाण यांचे आभार व्यक्त केले .

# मालमत्ता करवाढ : महापालिकेच्या दादागिरीविरोधात जनमत एकवटतेय

महापालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी मालमत्ता कर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. दंड आकारण्याचेही ठरवले आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सुविधा देण्यासाठी पुढाकार न घेणारी पालिका कर अकारणीसाठी दबावतंत्राचा वापर करत असल्यामुळे पालिकेच्या दादागीरी विरूध्द जनमत एकवटत आहे. विकासासाठी आतापर्यंत आलेल्या निधीचा काय विनीयोग केला असा प्रश्र्नही सर्व सामांन्य विचारत आहेत.

मालमत्ता धारकांना कमी अधिक कर आकारल्याने नागरिकांमध्ये एकीकडे संभ्रम तर दुसरीकडे तिव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नव्या कर रचनेमुळे सामाजिक कार्यासह शिक्षण, विवाह सोहळे आणि अगदी जगणेही महाग होण्याची शक्यता आहे. यामुळे मोठा रोष निर्माण होत आहे.एकीकडे वाढीव मालमत्ता कराबाबत नगरसेवकांमध्ये नाराजी असताना दुसरीकडे सत्ताधारी गटातही नाराजीचे प्रमाण वाढत आहे. त्यांचे म्हणने ऐकुन घेता कर वाढीच्या समर्थनासाठी पालिका प्रशासनाच्या वतीने नगरसेवकांवर दबावतंत्राचा वापर केला जात आहे. ही नाराजी थेट पक्षाच्या नेत्यांकडे नगरसेवक व्यक्त करीत आहेत. सत्ता ताब्यात घेतल्यानंतर बोटावर नगरसेवक वगळता इतर सर्व नगरसेवक एकसंघ होते. मात्र आता परिस्थिती हळुहळु बदलत आहे. यास केवळ वाढीव मालमत्ता कर हे कारण नसुन लहान-सहान कामे




होत नसल्यानेही नाराज नगरसेवकांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या राजकारणात आता मतभेद वाढत आहे. त्याचा परिणाम विकासावर होत असल्याचे बोलल्या जात आहे.महापालिकेने मालमत्ताकरात वाढ केली आहे. त्यामुळे हे शहर लवकरच कराचे शहर म्हणुन गणले जावू शकते. सामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडला आहे.

उत्पन्न वाढवण्याच्या गोंडस नावाखाली महापालिकेने मालमत्ता कराचा बोजा जनतेच्या माथी मारण्याचा निर्णय घेतला. सुविधा आणि विकासाच्या बाबतीत मंत्रालय पातळीवरही आपली विषेश ओळख असलेल्या महापालिकेने अचानक कररचनेत अमानविय वाढ केली आहे. शहरवासीयांना सुविधा देण्यासाठी त्यांच्या विकासासाठी, पालिकेतील कर्मचाऱ्यांच्या पगाराचे नियोजन करण्यासाठी, कधीच पुढाकार घेणारी पालिका करांच्या माध्यमातुन सर्व सामांन्यांच्या खिशाला भगदाड पाडण्यासाठी अक्षरश: दबावतंत्राचा वापर करत असल्याचे चित्र आहे.




**वेळीच जागे होण्याची गरज**

**एवढेच नाही तर जुलमी आदेश काढत दबाव आणत आहे या प्रवृत्ती मुळे जनतेचा रोष वाढत आहे. विकासाच्या नावाखाली हा खेळ मांडला आहे. पण विकासासाठी आधी आलेल्या निधीचे नेमके काय झाले किती निधी आजही नेमका कोठे वापरला जात आहे हे विचारण्याचा अधिकार जनतेला आहे. पालिका आणि प्रशासनाने वेळीच जागे होण्याची गरज आहे.**

# जिल्हाभरात जुगाराचे आणि गावठी दारूच्या अड्ड्यांवर छापेमारी

धुळे । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी अवैध धंद्यांविरोधात झिरो टॉलरेन्सचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांना दिल्याने पोलीस दल कमालीचे आक्रमक झाले आहे. काल जिल्हाभरात जुगाराचे आणि गावठी दारूच्या अड्ड्यांवर छापामारी करण्यात आली. यात मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल हाती लागला.

जिल्हाभरात गावठी दारू विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. धुळे तालुक्यात एकूण ६ कारवाया झाल्यात. तर मोहाडी दोन, शिंदखेडा २, थाळनेर, नरडाणा, सोनगीर, निजामपूर प्रत्येकी एक ठिकाणी झाली. यात गावठी दारू विकणार्या १३ जणांविरूद्ध गुन्हा दाखल झाला. पोलिसांच्या कारवाईत ३३५ लिटर व १८ हजार ९५० रूपये किमतीची दारू मिळून आली. पोलीस दलाने जुगार्यांनाही सळो की पळो करून सोडले आहे. काल धुळे शहर, प. देवपूर, धुळे तालुका आणि निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगार खेळणार्यांवर कारवाई झाली. दरम्यान, वासखेडी रोडवर नॅशनल सांस्कृतिक क्रीडा मंडळावर धाड टाकण्यात आली असता तिथे ३ पत्तीचा खेळ सुरू होता. पोलिसांच्या कारवाईत दुचाकी, रोकड मिळून तब्बल ४ लाख ६ हजार ९५० रूपयांचा ऐवज हाती लागला.

## प्रश्न 'इंडिया'चा

भाजपच्या विरोधात अजूनही असंख्य मतदार आहेत. त्यांना एकत्र आणणे व आपल्या बाजूने वळवणे हे 'इंडिया' आघाडी समोरचे मोठे आव्हान आहे ते पेलण्यास त्यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. विरोधी पक्षांनी स्थापन केलेल्या 'इंडिया' आघाडीची काल होणारी बैठक या महिन्याच्या तिसर्या आठवड्यापर्यंत लांबली आहे. आघाडीतील तीन महत्त्वाच्या पक्षांच्या प्रमुखांनी या बैठकीस उपस्थित राहण्यात आपली असमर्थता व्यक्त केली होती. बिहारचे मुख्यमंत्री व संयुक्त जनता दलाचे नेते नितीश कुमार यांची प्रकृती ठीक नाही. तामिळनाडूचे मुख्य मंत्री एम. के. स्टॅलिन राज्यातील पूरस्थितीमुळे येऊ शकत नाहीत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी आपल्या कुटुंबात विवाह समारंभ असल्याने बैठकीस उपस्थित राहता येत नसल्याचे कळवले आहे. राष्ट्रीय जनता दलाचे लालू प्रसाद यादव आणि बिहारचे उप मुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी मात्र आपण बैठकीस येत असल्याचे कळवले होते; पण ती झालीच नाही. विधानसभांच्या ताज्या निवडणुकीत काँग्रेसचा धुव्वा उडाल्यानंतर इंडिया आघाडीतील घटक पक्षांचा नूर बदलला आहे हे स्पष्ट आहे. काल होणारी बैठक रद्द करणे काँग्रेसला भाग पडले आहे हे न बोलले गेलेले वास्तव आहे. पाचही राज्यांत काँग्रेसने आघाडीतील एकाही पक्षाला सोबत न घेता 'स्व बळावर' लढण्याचे ठरवले. त्यांचा हा एकट्याने जाण्याचा एकतर्फी निर्णय आघाडीतील अनेकांना पसंत पडलेला नाही, हे त्यांच्या प्रतिक्रियांवरून कळते.

मध्य प्रदेशात समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी काही जागा मागितल्या होत्या; पण काँग्रसने त्या दिल्या नाहीत. त्या वेळीच अखिलेश यांनी काँग्रेसच्या एकारलेल्या भूमिकेवर टीका केली होती. समाजवादी पक्षाने आपले काही उमेदवार उभे केले. तेही पराभूत झाले. निकाल जाहीर झाल्यानंतर ममतादीदींनी, हा काँग्रेसचा पराभव आहे, जनतेचा नाही, अशी प्रतिक्रिया दिली होती. 'इंडिया'तील पक्षांना काही जागा सोडल्या असत्या, तर काँग्रेसला हा पराभव टाळता आला असता, असेही त्या म्हणाल्या. अखिलेश यांनी तर थेट 'अहंकारा'चा उल्लेख करत, त्याची शिक्षा मिळाली असेही मत व्यक्त केले. या निकालांनी 'इंडिया' आघाडीच्या पुढील वाटचालीवर किंबहुना भविष्यावरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. 'इंडिया' आघाडीची स्थापना अलीकडेच झाली. त्यातील घटकपक्षांच्या नेत्यांच्या बैठकाही झाल्या. प्रथमपासूनच ती एकसंध नव्हती. सर्वांना एकत्र आणण्यासाठी नितीश कुमार, शरद पवार, मल्लिकार्जुन खर्गे यांना बरेच प्रयास करावे लागले. आता तर तिची स्थिती नाजूक झाली आहे. नेत्यांचे अहंकार हा एक भाग आहेच; पण तत्त्वे व विचारधारा- काही असलीच तर- त्यांचा संघर्ष, हितसंबंध व महत्त्वाकांक्षा यांचाही अडसर आहे. आघाडीत सहभागी होणे त्या पक्षांच्या मतदारांना रुचेल की नाही हे स्पष्ट होणे हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण येथे आघाडीच्या नेतृत्वाचा प्रश्न येतो. भारतात सर्वत्र आपला विस्तार असल्याने आघाडीचे नेतृत्व आपल्याकडे यावे, असे काँग्रेसने सूचित केले होते. काँग्रेस शिवाय भाजपविरोधी आघाडी उभी राहू शकत नाही, हे सत्य असले तरी त्या पक्षाचे नेतृत्व इतरांनी मान्य करणे अवघड होते. आता काँग्रेसच्या जबर पराभवाने हा मुद्दा ठळकपणे समोर आला आहे. ममतादीदींकडे नेतृत्व आले पाहिजे, असे त्या पक्षाचे म्हणणे आहे, तर आघाडीचा पंतप्रधान पदाचा चेहरा नितीश कुमार असले पाहिजेत, असे त्यांचे समर्थक म्हणू लागले आहेत. इंडिया आघाडीतील पक्षांच्या नेत्यांना पाचही राज्यांत प्रचारासाठी बोलावणे काँग्रेसला सहज शक्य होते. त्यामुळे एक पर्याय उभा राहात असल्याचा संदेश मतदारांत गेला असता. त्याचा फायदा काँग्रेसला होऊ शकला असता. गेल्या सुमारे तीन महिन्यांत 'इंडिया' आघाडीचे अस्तित्व जाणवले नाही. तीन राज्यांत सर्व थरातील मतदारांनी भाजपला पाठिंबा दिला आहे. त्याचे कारण शोधणे आता 'इंडिया'ला भाग आहे. त्यांच्या प्रचाराचा रोख 'नकारात्मक'वरून 'सकारात्माक' करावा लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केल्याने मतदार विरोधी पक्षांकडे वळत नाहीत, हे दिसले आहे. देशाच्या व मतदारांच्या भल्यासाठी आपण एकत्र व बांधील आहोत हे त्यांना दाखवावे लागेल.

# निकालानंतर इंडिया आघाडीत धुसफुस



पाच राज्यांचा विधानसभेचा निकाल लागला आणि मस्तीत वावरणाऱ्या काँग्रेसचे पाय जमिनीवर आले. छत्तीसगड आणि राजस्थानमधील काँग्रेसच्या हातातील सत्ता खेचून भाजपाने मध्य प्रदेश राज्यातील सत्ता कायम राखल्याने हिंदी पट्ट्यात काँग्रेसचे नामोनिशाण मिटल्यातच जमा आहे. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या काँग्रेसला आता पुन्हा इंडिया आघाडीची आठवण झाली आणि तीन राज्यांत भाजपा जिंकल्यानंतर आता आपले कसे होणार? या चिंतेत असलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी

६ डिसेंबरला दिल्लीत 'इंडिया' आघाडीची बैठक बोलावली होती; परंतु बैठकीआधीच इंडिया आघाडीत रुसवे-फुगवे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ही बैठक आता तातडीने रद्द करण्याची वेळ काँग्रेसवर आली. केंद्रातील मोदी सरकारला टक्कर देण्यासाठी विविध राज्यांतील भाजपाविरोधी पक्षांची मोट बांधण्याचा प्रयत्न झाला. बिहार, बेंगलोर, मुंबई येथे 'हम सब एक है' असा आव आणण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी केला. खरंतर इंडियामध्ये सामील झालेल्या एकूण पक्षातील प्रमुख नेत्यांकडे नजर मारली, तर बहुतांश नेत्यांभोवती ईडीच्या कारवाईचा फास आवळला गेल्याने, सर्व समदुखी एकत्र आल्याचे चित्र उभे राहिले होते. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या म्हणण्यानुसार, हे सर्व घमेंडिया एकत्र आले आहेत. यांना देशाच्या प्रगतीबद्दल काही पडलेले नाही.

पंतप्रधान मोदी जे बोलतात तेच जनतेला पटते, हे पुन्हा एकदा तीन राज्यांच्या विजयानंतर स्पष्ट झाले आहे. आता राहिला प्रश्न मिझोराम आणि तेलंगणाचा. पूर्वकडील मिझोराममध्ये स्थानिक पातळीवरील आघाडींना तेथील जनता जास्त महत्त्व देत असल्याने भाजपा आणि काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षांना त्या ठिकाणी म्हणावेसे तसे यश मिळवता आले नाही. तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यात भाजपाच्या मताचा टक्का वाढला आहे, ही जमेची बाजू आहे.

या पाच राज्यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान काँग्रेसला इंडिया आघाडीबद्दल सोयरसुतक नव्हते. इंडिया आघाडीबद्दल काँग्रेसला एवढाच कळवळा होता, तर मध्य प्रदेशमध्ये अखिलेश यादव यांच्याकडून समाजवादी पार्टीकडून काही जागा सोडा असा आग्रह धरला होता. तेव्हा कोण अखिलेश असे काँग्रेसचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असलेले कमलनाथ म्हणाले होते. इंडिया आघाडीतील घटक पक्षांचा इतका अपमान केल्यानंतर काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाकडून कमलनाथाच्या घमेंडी वृत्तीकडून दुर्लक्ष केले गेले होते. हीच बाब जाट समाजातील प्राबल्य असलेल्या मतदारसंघावर जयंत चौधरी यांनी काही जागा सोडाव्यात म्हणून काँग्रेसला आग्रह केला होता; परंतु त्यांनाही वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या.

इंडिया आघाडीतील आणखी एक पक्ष आप यांचे दोन मुख्यमंत्री तीन राज्यांत प्रचारात व्यस्त होते. त्यामुळे राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांत इंडिया आघाडीतील पक्ष ऐकमेंकाविरुद्ध गरळ ओकत होते. मात्र निकाल भाजपाच्या बाजूने गेल्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाला इंडिया म्हणून एकत्र यायला हवे असे पुन्हा वाटू लागले आहे. तसे मध्य प्रदेश, राजस्थानमधील मतांची टक्केवारी पाहता समाजवादी आणि अन्य इंडियातील घटक पक्षांना जागा सोडल्या असत्या तरी फरक पडला नसता. मात्र, यानिमित्ताने लोकसभा निवडणुकीच्या आधी इंडिया आघाडीत काय घडणार आहे याचा क्लायमॅक्स आता समोर येत आहे.

कर्नाटक आणि हिमाचलमध्ये मिळालेल्या विजयामुळे काँग्रेसच्या डोक्यात हवा होती. पाचपैकी चार राज्य जिंकू असा फाजील आत्मविश्वास त्यांच्या नेत्यांनी खासगीत बोलून दाखवला होता. त्यातून आता विधानसभा निवडणुकांच्या काळात काँग्रेसने इंडिया आघाडीची बैठक घेण्यास टाळाटाळ केली होती. निकालानंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना जाग आली आणि त्यांनी बैठक बोलावली होती. मात्र, दिल्लीतील घमेंडियाची ही बैठकच रद्द करण्याची नामुष्कीही काँग्रेसवर ओढवली. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही या बैठकीपासून दूर राहणे पसंत केले.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पूर्वनियोजित कार्यक्रमांचे कारण देत बैठकीला येण्यास नकार दिला. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन हेही बैठकीला हजर राहणार नव्हते. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या बैठकीबाबत दिलेल्या उत्तरानंतर इंडिया आघाडीत समन्वय नसल्याचे समोर आले आहे. ममतांच्या म्हणण्यानुसार आपल्याला बैठकीबद्दल कल्पनाच नव्हती. या बैठकीबाबत मला कोणीही सांगितले नाही किंवा मला फोन करूनही या संदर्भात माहिती देण्यात आली नाही. अचानक बैठकीसाठी बोलावले असते तरी माझे कार्यक्रम कसे बदलता येतील?, असा प्रश्न उपस्थित करत ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीपासून सुरक्षित अंतर ठेवण्यास सुरुवात केली आहे, असे वाटते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०२४ साली होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत करिष्मा दाखवणार याचे भास आतापासून इंडिया आघाडीतील घटक पक्षांना वाटू लागल्याने, काँग्रेसच्या नादाला लागून राज्यात अस्तित्व दाखविणाऱ्या पार्टीचे नुकसान करून घेण्यात यापुढे कोण तयार होतील असे वाटत नाही. त्यामुळे, रुसवे-फुगव्यांसह नाना कारणे देऊन इंडिया आघाडीची स्वत:ला वेगळे कसे करता येईल? याचा द्राविडी प्राणायाम आता इंडिया आघाडीत होत असताना दिसत आहे.

# 'हवे' पणाला हवी काहीतरी मर्यादा!

परमेश्वर हा विषय आपल्यासाठी अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. आपले सगळे जीवन जे आहे ते त्यांच्यावर अवलंबून आहे. परमेश्वर आपल्या जीवनाचे अधिष्ठान आहे, आपल्या जीवनाचा पाया आहे तसाच तो आपल्या जीवनाचे शिखर आहे. आपल्या जीवनाचे मूळही तोच व फळही तोच. या परमेश्वराचे अस्तित्व आपल्याला पावलोपावली, क्षणोक्षणी जाणवत असते. पण ते आपण जाणवून घेत नाही. तुम्ही म्हणाल आपण हे जाणवून का घेत नाही, तर याचे कारण एकच आहे, ते म्हणजे आपल्याला जाणवून घेण्याची इच्छा नसते. आपल्याला हवे व नको या दोन गोष्टी असतात. जाणवून घेण्याची इच्छाच नसल्याचे कारणही हेच की जे हवे वा नको यांत आपण अडकलेले असतो. हवे काय ते मिळवण्याचा प्रयत्न करतो व नको काय ते टाळण्याचा प्रयत्न करतो.



थोडक्यात सांगायचे म्हणजे हवे व नको या दोन गोष्टींमध्ये आपले जीवन चाललेले असते. बघा तुम्ही, सकाळी उठल्याबरोबर चहा केला पाहिजे. नवऱ्याला चहा हवा, आपल्याला स्वतःलाही चहा हवा. मग अंघोळ केली पाहिजे, मग जेवण केले पाहिजे. पाहिजे पाहिजे, हवे हवे असेच चालले असते. या हवेला श्रळाळीं नसते. जशी आपल्या आसपासची हवा! जसे त्या हवेला limit नसते, तसे या हवेलाही limit नसते. हवे हवे म्हणताना ते मिळत गेले की आणखी पाहिजे, मिळत गेले की आणखी पाहिजे.

तुम्ही म्हणाल हे हवे नको का?, तर हवे. नाहीतर त्या जीवनाला काही अर्थच राहणार नाही. मला आता काहीही नको असे म्हटले की जीवनच संपले. त्या जीवनाला काही अर्थच उरला नसल्याने तो काहीच करणार नाही. जोपर्यंत आपल्याला काहीतरी हवे आहे व काहीतरी नको आहे, तोपर्यंत आपल्या जीवनाला अर्थ आहे. हवे नको वाईट नाही. पण या हवेपणाला काहीतरी मर्यादा पाहिजेत. पैसा पैसा करतात. पैसा हवाच, पैसा नको कोण म्हणेल? पैशाशिवाय एक पाऊलही टाकता येणार नाही. घरांत राहायचे, तरी पैसा पाहिजे. प्रॉपर्टी टॅक्स दिला नाही, भाडे भरले नाही, तर जागा खाली करावी लागेल. पैशाशिवाय एक पाऊलही टाकता येणार नाही हे सांगायला प्रवचन करायला नको.

पण पैसा किती हवा? Comforts of life मिळवण्याएवढा पैसा हवा. luxuries कडे जातो तेव्हा पंचाईत होते. आता गंमत अशी झालेली आहे की, Luxurious life hr Necessity झालेली आहे. ज्याला एकेकाळी Luxurious म्हणत होतो तेच आता Necessity झालेले आहे. मोटर ही आता Luxurious राहिलेली नाही, तर ती Necessity झालेली आहे. Telephone hm Luxurious राहिलेला नाही, तर Necessity आहे. मोबाइल हा Luxurious राहिलेला नाही, तर Necessity आहे. विमानाने जाणे येणे हे आता Necessity झालेले आहे, कारण वेळ वाचतो. आम्हाला गोव्यात गाडीने जाण्यासाठी १६-१७ तास लागतात, पण तेच विमानाने पाऊण तासात पोहोचतो. किती वेळ वाचला? आता या सगळ्या Necessity झाल्या आहेत, कारण आता लोकांना वेळेचे महत्त्व फार आहे.

# मराठी पाट्या आणि मराठी प्रेम




महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी प्रथम भाषा म्हणून मराठीचाच विचार केला जात आहे ना, याकडे आपण प्रत्येकाने कटाक्षाने लक्ष द्यायला हवे, आपल्यापैकी अनेक जण आपली शैक्षणिक अर्हता दाखवण्यासाठी काही उच्चभ्रू ठिकाणी गेल्यावर, मराठीला डावलून इंग्रजीत संभाषण करण्याला पसंती देतो. हेही आपल्यातील गुलामगिरीचेच लक्षण असून आपले प्रथम प्राधान्य हे मराठीलाच असायला हवे. आपले वागणे-बोलणे यातून मराठीविषयीचा स्वाभिमान जपायला हवा. महाराष्ट्राच्या शालेय अभ्यासक्रमात प्रत्येक भाषिक शाळांना मराठी विषय अनिवार्य करण्यात आलेला आहे परिणामी इथे लहानपणापासून शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकाला मराठी भाषेचे पूर्णपणे ज्ञान असतेच त्यामुळे सर्वांशी आपण मराठीतूनच संवाद साधायला हवा.


सध्याच्या युगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी आज बहुतांश पालक आपल्या मुलांना कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांत घालतात, इग्रजी भाषा शिकण्यासाठी अतिरिक्त शिकवण्या लावतात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती करतात. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. पालकांनी असे न करता आपल्या पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. गुड मॉर्निंग-गुड नाईट ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. ज्ञात असलेल्या मराठी शब्दांचा वापर संवाद साधताना प्रकर्षाने करा. मराठी भाषेचा केवळ अभिमान उराशी बाळगून चालणार नाही, तर आपली संवादाची आणि लिखाणाची मराठी भाषाही सुधारायला हवी. आपली भाषा सुधारली तरच ती ऐकून आपल्या पाल्यांची भाषा सुधारेल. मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही आपण या दोन्ही भाषेतील शब्द सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने मराठीला जपायचे असेल तर तिच्यावर प्रेम करायला शिकले पाहिजे. केवळ दुकानांवरील पाट्या बदलून चालणार नाही, तर आपल्या मनावरील अमराठी पाट्या पुसून शुद्ध मराठीच्या पाट्या आपल्या अंतःकरणात लावल्या पाहिजेत.



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

**समाप्त**

## शब्दकोडे-२५५



**आडवे शब्द**

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा ५. हार ८. काळे ज्वालाग्रही खनिज ११. मऊ, मृदू ११अ. दारुचा एक प्रकार १२. यजमान, पती १४. रक्षण करणारा १५. बाजार १६. पावसाची झड १७. पापणी न हलवता (पाहणे) १९. सरपणाचे दुकान २१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ २४. जोम, मस्ती २५. अवस्था, दशा २७. पंख २८. तुरुंग २९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी ३१. वर्ष ३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ ३४. हळद पिऊन का अशी होता येणार? ३५. कागदावर आखलेला कप्पा ३७. आचारी ३९. माफी मागणारा ४२. दिवाणखाना ४३. सत्य ४४. अतिरेक, टोक ४५. मोठे गाव ४७. मातापिता ५१. कुटी ५२. कागदाचे एक परिमाण ५३. ढीग, चळत ५४. शाळेतील शिक्षिका ५५. केस काळे करण्याचे साधन ५७. वेल ५९. समुद्र ६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या ६३. लढतना मृत्यू येणे ६५. अखंड ६६. दृष्ट ६७. स्त्री ६८. रोखलेली नजर ६९. शेळी ७१. मैत्रीण ७२. ठराविक पैसे ७४. पायंडा, पद्धत ७६. दरोडा ७८. धोकादायक ८०. माणूस ८२. सूर्याचे एक नाव ८४. सटकन, पटकन ८५. मातीचा कण ८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

**उभे शब्द**

१. रत्नजडित माळ २. अंत:करण ३. किंमत ४. नमन ५. मागील अंगणाचा दरवाजा ६. मीठ ७. अरण्य ८. नवाकोरा ९. रेचक १०. एक पालेभाजी १३. दरारा, इभ्रत, वजन १८. सुसर २०. जनगणना २२. नरमांजर २३. पृथ्वी २५. भूतकाळ २६. चिंतन २७. परीक्षा घेणारा ३०. आशीर्वाद देणारी ३१. मित्र ३३. प्रयत्न ३६. बेकरीतील एक गोड पदार्थ ३८. पहाटेची गाढ निद्रा ४०. तुळशीमाळ धारण करणारा ४१. पार्थिवावरचे वस्त्र ४५. यमपुरी ४६. घरातील मोठी माणसे ४८. घाबरणे ४९. एक बारीक धान्य ५०. पायाचे उभे हाड ५४. स्त्रीलंपट ५६. चकचकीत, स्वच्छ ५८. चांदणी ५९. भेग, चीर ६०. किल्लेदार ६२. दिवसाचा चोविसावा भाग ६४. धनुष्यबाण ६५. अफूचे बी ६७. पूर्ण नेस्तनाबूत ६९. भाजपची विद्यार्थी संघटना ७०. ज्ञाती ७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय ७५. होडी ७७. वसन, वस्त्र ७९. बशीचा जोडीदार ८१. नवरामुलगा ८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

## शब्दकोडे-२५४ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

**उभे उत्तर**

१.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# कोविड काळात कर्तव्य बजावतांना मृत पावलेल्या कर्मचारी वारसांना दिड कोटी रुपयांचे सानुग्रह सहाय्य

**विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते अनुदानान प्रदान**

**नाशिक । प्रतिनिधी**





ग्रामपंचायत स्तरावरील ग्रामपंचायत कर्मचारी, तसेच जिल्हा परिषद आस्थापनेवरील ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी, सीएससी कंपनीचे केंद्र चालक, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कंत्राटी कर्मचारी आणि कामगार यांना कर्तव्य बजावताना कोविड संसर्ग आजारामुळे दि. ३० जून, २०२१ पर्यंत मृत्यु झाल्यास मयत कर्मचाऱ्याच्या वारसांना प्रत्येकी ५० लाखाचे विमा कवच देण्यात आले होते. त्यानुषंगाने शासन निर्णयातील सर्व अटी आणि शर्थीची पुर्तता होत असल्याने कायदेशीर वारसांना कर्तव्य बजावताना कोविड या संसर्ग आजारामुळे मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास विमा कवच तसेच सानुग्रह सहाय्य रक्कम रुपये एक कोटी पन्नास लाख नाशिक जिल्हा परिषद, नाशिक यांना शासनाकडुन प्राप्त झालेले आहे.

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते सानुग्रह अनुदानाची प्रत प्रदान करण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भालचंद्र चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) रवींद्र परदेशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) वर्षा फडोळ उपस्थित होते. पंचायत समिती दिंडोरी, येथील विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) कै. दिनकर हिराजी खंबाईत यांचे वारसदार संगीता दिनकर खंबाईत, पंचायत समिती दिंडोरी येथील ग्रामविकास अधिकारी कै. राधेशाम तात्याराव खोपे यांचे वारसदार प्रमिला राधेशाम खोपे, ग्रामपंचायत नगाव ता. मालेगाव येथील केंद्र चालक कै. रविंद्र आत्माराम शेलार यांचे वारसदार कल्याणी रविंद्र शेलार यांना शासनाची मंजुर अनुदानाची प्रत देण्यात आली.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये प्रथमतः ग्रामपंचायत विभागातील तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राप) रवींद्र परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली सहायक गट विकास अधिकारी प्रशांत पवार कनिष्ठ प्रशासन अधिकारी नितीन पवार, वरिष्ठ सहाय्यक अशोक अहिरे व स्टिवन शहाबंद्री यांनी तालुकास्तरावरुन प्रस्ताव मागवुन शासनाकडे मंजुरी कामी प्रस्ताव सादर करुन मंजुरीबाबत पाठपुरावा केला. त्यानंतर शासन स्तरावरुन भिसाजी जोईल यांनी ग्रामविकास विभागाचे उप सचिव राजेश भोईर, यांच्या मार्गदर्शनाखाली हे अनुदान हे जिल्हा कोषागार कार्यालयास प्राप्त झाले. यानंतर कोषागार अधिकारी महेश बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली लेखाधिकारी अशोक घुमरे यांनी नाशिक जिल्हा परिषदेस सादर अनुदान वितरीत करण्यात आले. त्यानंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी भालचंद्र चव्हाण व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), रवींद्र परदेशी यांचे मागदर्शनाखाली वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी यांनी सदरचे अनुदान तालुका स्तरावर दि.७ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये वितरीत करण्यात आले. त्यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती दिंडारी नम्रता जगताप व गट विकास अधिकारी, पंचायत समिती मालेगांव भरत वेन्दे यांचे मार्गदशनाखाली तालुकास्तरावरुन संबधित वारसदार यांच्या खात्यावर जमा करणे करण्यात आले आहे.

## न्यूज कॉलम

### पाच लाखांची रोकड लांबविली

**धुळे ।** चोरट्याने कारमधील पाच लाखांची रोकड लंपास केली. शहरातील गांधी पुतळा चौकात १ डिसेंबरला ही घटना घडली. शफीक शेख लुकमान यांनी त्यांची कार (एमएच १९, सीयू ५४३३) गांधी पुतळ्यासमोरील कॉर्नवर थांबविली. एकाशी बोलत असताना चोरट्याने कारमधील सीट हॅण्ड ब्रेकजवळ प्लॉस्टिकच्या पिशवीतील पाच लाखांची रोकड लंपास केली. घटनेची आझादनगर पोलिस ठाण्यात नोंद झाली.

### विजेच्या धक्क्याने मजुराचा मृत्यू

**धुळे ।** देवपुरातील नवतेज बाजारसमोर विद्युत खांबावर काम करीत असताना शॉक लागून मजुराचा मृत्यू झाला. गणेश दिलीप शिंदे विजेच्या खाबांवरील तारा बदलण्याचे काम सुरू असताना गणेश शिंदे यांना विजेचा धक्का लागला. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याबाबत आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

# कृषी विज्ञान संकुल येथील इमारत बांधकामासाठी ५० कोटी रुपये मंजूर

**नाशिक । प्रतिनिधी**

पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मालेगाव बाह्य मतदार संघातील काष्टी येथील कृषी विज्ञान संकुल काष्टी येथील इमारत बांधकामासाठी ५० कोटी रुपये निधीस काल रोजी मंजुरी मिळाली आहे. नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांचा हा महत्वकांक्षी प्रकल्प असून यासाठी सातत्याने ना.भुसे यांनी पाठपुरावा यांनी केला आहे.

काष्टी येथील कृषी विज्ञान संकुलात कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय साकारण्यात आले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत मौजे काष्टी, ता. मालेगाव जि. नाशिक येथे कृषी विज्ञान संकुलात कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय ही तीन महाविद्यालये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती.

कृषी महाविद्यालय आणि उद्यान विद्या महाविद्यालयाची प्रवेश क्षमता प्रत्येकी ६० असून अभ्यासक्रमाचा कालावधी ४ वर्षांचा आहे तसेच कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ४० विद्यार्थ्यांची असून अभ्यासक्रमाचा कालावधी ४ वर्षांचा आहे.

कृषी विज्ञान संकुलांतर्गत कृषी शिक्षणाबरोबरच कृषी पूरक उद्योग विकास, प्रक्रिया केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केंद्र व सुविधा केंद्र, आदर्श रोपवाटिका संकुल, सर्व कृषी निविष्ठांचे संशोधन आणि निर्माण केंद्र असे विविध कृषी विषयक उपक्रम विकसित करण्याचे नियोजन आहे. या संकुलामुळे नाशिक जिल्ह्यात एकाच ठिकाणी कृषी शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. कृषी पदवीधारकांच्या माध्यमातून विविध ठिकाणी कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, ग्रामपातळीवरील विस्तार, ग्रामसेवक, कृषी मदतनीस, तज्ज्ञ प्रशिक्षक, कृषी संशोधक, आधुनिक शेतकरी यांना सहाय्य करून देशाच्या कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान देणे, कृषी आधारित स्टार्टअप्स सुरु करणे यासारख्या बाबी साध्य करणे यामुळे शक्य झाले आहे.

# येवला मतदारसंघात २ मंडळ अधिकारी, २७ तलाठी कार्यालयांच्या बांधकामासाठी ३ कोटी ९० लाख निधी मंजूर

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात येवला मतदारसंघातील २ मंडळ अधिकारी व २७ तलाठी कार्यालयास मंजुरी मिळाली आहे. यासाठी ३ कोटी ९० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना महसुली कामांसाठी अधिक सुविधा मिळणार आहे.

येवला मतदारसंघातील मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालयांचे कामे प्रगतीपथावर आहेत मात्र उरलेले २ मंडळ अधिकारी व २७ तलाठी कार्यालय मंजुरीसाठी मंत्री छगन भुजबळ यांचा शासनाकडे पाठपुरावा सुरु होता. त्यानुसार डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात येवला तालुक्यात एकूण २ मंडळ अधिकारी व २५ तलाठी कार्यालय मंजूर करण्यात आले असून निफाड तालुक्यातील उर्वरीत गाजरवाडी व नांदूरमध्यमेश्वर तलाठी कार्यालयास मंजुरी मिळाली आहे.

**येवला शासकीय विश्राम गृहासाठी ५ कोटी ८१ लाख तर प्रशासकीय संकुलातील बैठक कक्षाचे नुतनीकरण करण्यासाठी ६२ लाख रुपये मंजूर**

**मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पात येवला शासकीय विश्राम गृहासाठी ५ कोटी ८१ लाख १७ हजार रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच येवला प्रशासकीय संकुलातील बैठक कक्षाचे नुतनीकरण व फर्निचरचे काम करण्यासाठी ६२ लक्ष ८४ हजार इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.**

### फवारणी औषधाने शेतकऱ्याचा मृत्यू

**धुळे ।** तालुक्यातील नंदाणे शिवारातील शेतात कांदा विकावर फवारणी करताना विषारी औषध नाकातोंडात गेल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मच्छिंद्र शिवदास पाटील (वय ४४) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मच्छिंद्र पाटील ७ नोव्हेंबरला शेतात कांदा पिकास औषध फवारणीसाठी गेले. यादरम्यान फवारणीचे विषारी औषध त्यांच्या नाकातोंडात गेल्याने उलटीचा त्रास होऊ लागला. त्यांना हिरे रुग्णालयात दाखल केले असता उपचार सुरू असताना ८ नोव्हेंबरला त्यांचा मृत्यू झाला. पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

# मालेगाव बाह्य मतदार संघातील रस्ते, पूल बांधण्यासाठी ४३ कोटी रुपये निधी मंजूर

**नाशिक । प्रतिनिधी**

हिवाळी पुरवणी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मालेगाव बाह्य मतदार संघातील रस्ते व पूल बांधण्यासाठी ४३ कोटी रुपये इतका भरघोस निधीला पहिल्या दिवशीच मान्यता मिळाली आहे. मालेगाव बाह्य मतदार संघाच्या विकासासाठी नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. या निधीतून रस्त्यांचा कायापालट होणार असून राज्य शासनाने रस्त्यांच्या विविध विकास कामांसाठी ४३ कोटी रुपयांचा निधी काल रोजी मंजूर केला आहे.

सदर निधी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस तसेच अजित पवार यांनी विशेष प्राधान्य देऊन मंजूर केला असून, यासाठी मंत्री दादाजी भुसे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

भाजप-शिवसेना- राष्ट्रवादी युतीचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी तर उपमुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडवणीस, अजित पवार यांनी कार्यभार सांभाळल्यानंतर राज्यातील रस्ते विकासाला प्राधान्य दिले आहे. मालेगाव बाह्य मतदार संघातील रस्ते विकास कामांसाठी निधी मंजूर करून आर्थिक साहाय्य केले आहे. निधीस मंजुरी मिळाल्याने मंत्री दादाजी भुसे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे आभार मानले आहेत.

अ‍ॅड. स्वप्निल सुरेश सोंजे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो.यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं. १४०८/२०२३**

बापू पुंडलिक शेगर वगैरे ............ अर्जदार
विा.
कोणीही नाही
(कै. सिंधुबाई बापू शेगर - मयत) ...... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. ०४/१२/२०२३ रोजी दि.कि.अर्ज नं. १४०८/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. सिंधुबाई बापू शेगर यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.१८/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. ६. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण- धुळे
दिनांक- ०६/१२/ २०२३ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
**अधिक्षक** मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.

# डॉ. आंबेडकर यांना छावा जनक्रांती संघटनेचे अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**



भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रतर्फे नाशिक येथील शालिमार चौक येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्र प्रदेशच्या महासचिव व कायदेशीर सल्लागार ड. अलका मोरे पाटील, छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्रच्या उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष ज्योती परदेशी, नाशिक जिल्हा महिला आघाडी शहर अध्यक्ष ड. उषा पगारे, जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्ष ड. मनीषा शेलोटकर, जिल्हा उपाध्यक्ष ड. गौरव तिडके यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कनिष्ठ सहाय्यक लिपिक, औषध निर्माण अधिकारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी होणार जि.प. पदभरती परीक्षा

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या वतीने विविध संवर्गांसाठी पदभरती करण्यात येत आहे दि. ५ ऑगस्ट रोजी या पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या जाहिरातीच्या अनुषंगाने आता कनिष्ठ सहाय्यक लिपिक, औषध निर्माण अधिकारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदासाठी होणार परीक्षा या ३ संवर्गातील पदांसाठी आयबीपीएस कंपनीच्या वतीने विविध परीक्षा केंद्रांवर १८ ते २६ डिसेंबर रोजी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाणार आहे.

यासंदर्भातील जिल्हा परिषद पदभरतीचे वेळापत्रक व परीक्षा केंद्र यासाठीचे प्रकटन हे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्यावतीने प्रसिद्ध करण्यात आले असून

विकास प्रेरणा
जिल्हा परिषद नाशिक

नाशिक जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर हे प्रकटन उपलब्ध करून देण्यात आले आहे. सर्व परीक्षार्थींनी याबाबत नोंद घ्यावी असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

**हॉल तिकीट डाऊनलोड कुठून करावे**

जिल्हा परिषद पदभरतीतील ३ संवर्गाच्या परीक्षा या १८ ते २६ डिसेंबर रोजी होणार असून आयबिपीएस कंपनीच्या http://ibpsonline.ibps.in/zpvpjun23/oeclašsep23/login.php?appid=f0bd2b03818a5edbf901626978e53c04 या संकेतस्थळावरून विद्यार्थांना हॉल तिकीट उपलब्ध होणार आहेत. विद्यार्थ्यांनी रजिस्टर केलेल्या मोबाईल नंबर व ईमेल आयडीवर देखील हॉल तिकीटची लिंक पाठवण्यात आलेली आहे.

**कुठल्या पदासाठी कधी होणार परीक्षा**

**१) कनिष्ठ सहायक लिपिक : दि. १८, १९, २० डिसेंबर २) औषध निर्माण अधिकारी : २१ व २६ डिसेंबर ३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक : २३, २४ डिसेंबर**

अ‍ॅड. शशिकांत आर. पाटील
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अर्ज नं. १३९२/२०२३**

१. शरद विश्राम उर्फ इश्राम पाटील
उ.वय.:- ५० वर्ष, धंदा :- शेती,
२. अनिल विश्राम उर्फ इश्राम पाटील
उ. वय - ४१ वर्ष, धंदा :- शेती
३. प्रकाश विश्राम उर्फ इश्राम पाटील
उ. वय.:- ४५ वर्ष, धंदा :- शेती,
४. दिनेश विश्राम उर्फ इश्राम पाटील
उ. वय.:- ४२ वर्ष, धंदा :- शेती
नं. १ ते ४ रा. दापुरा, दापुरी, ता. जि. धुळे.
५. सौ. ज्योती बापु पाटील
उ. वय.:- ५४ वर्ष, धंदा :- घरकाम
रा. मांजरे, ता. जि. नंदुरबार.. ...अर्जदार
वि
कोणीही नाही ....सामनेवाला
आणि
कै. विश्राम उर्फ इश्राम नवल पाटील (मयत)
मृत्यु दिनांक ०१/०१/२०२३,
मृत्यु ठिकाण - दापुरा, दापुरी, ता. जि. धुळे. ...मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. विश्राम उर्फ इश्राम नवल पाटील (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ५ हे कायदेशीर वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय तसेच महसुल दप्तरी तसेच खाजगी कामाकरीता आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. ०१/१२/ २०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. २४/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ क. स्तर कोर्ट नं.८, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०५/१२/२०२३ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे
**अधिक्षक** दिवाणी न्यायालय सो. व. स्तर, धुळे

अ‍ॅड.नंदकिशोर प्र. मोरे
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथिल मा.२ से सह दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं. १४०३/२०२३**

श्रीमती सिंधुबेन माधवराव पाटील, वगैरे ५ ...अर्जदार
विा.
कोणीही नाही ...सा.वाला
कै. माधवराव वनाजी पाटील ....(मयत)
वारस दाखला मिळणेसाठी

सदरचा अर्ज अर्जदार नं. १ ते ६ यांनी कै. माधवराव वनाजी पाटील हे दि. ११/०१/२०१६ रोजी अहमदाबाद येथे मयत झाल्याने त्यांचे पत्नी व मुले या नात्याने अर्जदारांनी मे. कोर्टात कायदेशीर वारस दाखला मौजे नगांव बु।। ता. जि. धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग २९९/२/१४३ क्षेत्र ०.९०.०० चौ. मी. आकारणी ९.०० पैसे या मिळकतीवर वारस म्हणुन नाव लावण्याच्या कारणास्तव या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद अर्जाचे कामी दि.२२/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास मे. कोर्टात व्यक्तीशः अथवा आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे/ हरकत नोंदवावी. मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येवुन अर्जदार क्र. १ ते ६ यांना वर नमुद कारणास्तव वारस दाखला देण्याची कार्यवाई होईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०५/१२/२०२३ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे
**अधिक्षक** सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे

## जाहीर फारकत नोटीस

तमास जनतेस व विशेषतः सौ.जान्हवी अनिल रासकर, वय- १८. धंदा घरकाम, रा. रासकर नगर, चितोड रोड, भाऊसोा. भोईटे माध्यमिक हायस्कुलजवळ, धुळे, ता. जि. धुळे यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

तुमचा व आमचे अशिल श्री. अनिल मधुकर रासकर, उ. वय - २९. धंदा:- मजुरी, रा. जुनी समता विद्यालयजवळ, रासकर नगर, धुळे ता. जि. धुळे यांच्यासोबत दि. ०४/१०/२०२२ मौजे धुळे, ता. जि. धुळे येथे हिंदु धर्म व समाजाच्या चालीरिती व रूढी परंपरेनुसार लग्न झालेले असून लग्नानंतर तुम्ही आमचे अशिलांसोबत २ महीने संसार केलेला आहे व आमचे अशिलांनी तुम्हांस वारंवार प्रतिष्ठीत लोकांमार्फत नांदविण्याकरीता प्रयत्न केले असता तुम्ही आमचे अशिलांकडे नांदण्यास येत नाही. यावरून तुमचे आमचे अशिलासोबत नांदण्याची इच्छा नाही असे स्पष्ट होते. त्यामुळे आमचे पक्षकारास तुमच्यासोबत संसार करायचा नाही, म्हणुन यापुढे आपले पतीपत्नी नातेसंबंध कायमचे संपुष्ठात येण्यासाठी सदरची जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

सबब तुम्हास या जाहिर नोटीस फारकत नोटीसीने कळविण्यात येते की. सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तुम्ही सौ. जान्हवी अनिल रासकर, वय- १८, धंदा- घरकाम, रा. रासकर नगर, चितोड रोड, भाऊ सोा. भोईटे माध्यमिक हायस्कुलजवळ, धुळे, ता. जि. धुळे यांचा आमचे पक्षकार श्री. अनिल मधुकर रासकर, उ.वयः - २९, धंदा :- मजुरी, रा. जुनी समता विद्यालयजवळ, रासकर नगर, धुळे ता. जि. धुळे यांच्याशी दि. ०४/१०/२०२२ रोजी झालेल्या विवाहाचे या जाहीर नोटीसीने फारकत/ घटस्फोट झाला असे समजण्यात यावेत.

धुळे
दिनांकः ७/१२/२०२३ जाहीर नोटीस प्रसिध्द देणार
**अनिल मधुकर रासकर**

सदरची जाहीर नोटीस आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरून तसेच सुचनेवरून प्रसिध्द केली असे.

अ‍ॅड. अनिल के. गवळी
नि.६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो. धुळे यांचे कोर्टात.**

**दि.कि.अर्ज नं. १४०९/२०२३**

वैजंताबाई बाबूराव पाटील वैगेरे ११ ....अर्जदार
।। वि ।।
कोणीही नाही ..........जाबदेणार
कै. भटू उर्फ भटा तानाजी पाटील .....मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ११ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ७ धुळे यांचे कडे दि.०४/१२/२०२३ रोजी कि. दि. अर्ज नं. १४०९/२०२३ चा अर्ज कै. भटू उर्फ भटा तानाजी पाटील रा. नरसिंह चौक, मु.पो कापडणे ता.जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. भटू उर्फ भटा तानाजी पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. २२/०१/२०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ७ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि.०५/१२/२०२३ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.
**अधिक्षक** दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे

## न्यूज कॉलम

### चहाटपरी फोडून आठ हजार लंपास

**धुळे ।** शहरातील चाळीसगाव रोडवरील कृषी फार्मच्या बाजूला चहाटपरी फोडून चोरट्यांनी आठ हजारांचा माल लांबविला. चोरीची घटना घडली. चोरट्यांनी शेगडी, सिलिंडर, पातेले, बिस्कीट पुडे, नानखटाई व रोकड असा आठ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. याबाबत टपरीचालक बंडू मुरलीधर येलपले (रा. रानमळा ता. धुळे) यांच्या तक्रारीवरून मोहाडी पोलिस ठाण्यात घटनेची नोंद झाली.

### पोलिसांना दमबाजी करणारा जेरबंद

**धुळे ।** देवपूरात एका सोडा गाडीवर उभ्या असलेल्या तरूणाने पोलिसांशी हुज्जत घातली. इतक्यावरच न थांबता त्याने सरकारी कामात अडथळा आणून एका पोलीस कर्मचाऱ्याची कॉलर पकडली. तसेच शोध पथक कर्मचाऱ्यांना दमबाजी केली. याप्रकरणी दोघांवर देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी ऋषिकेश भांडारकर याला ताब्यात घेतले आहे. तर वेलकम सोड्याचा चालक फरार झाला आहे.

# सिंचन विहीर योजनेतून वगळण्यात आलेल्या गावांनाही लाभ मिळणार : आ.कुणाल पाटील

**धुळे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीरींचा लाभ आता धुळे तालुक्यातील सर्वच गावातील लाभासाठी पात्र असलेल्या शेतकर्यांना सिंचन विहीरींचा लाभ मिळणार असून भूजल पातळीच्या कमतरते अभावी वगळण्यात आलेल्या गावांचा पुर्नसर्व्हेक्षण करुन सदर गावांना लाभ मिळवून देण्यासाठी आ.कुणाल पाटील यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुनसर्व्हेक्षण केल्याने आता धुळे तालुक्यातील सर्वच गावांतील लाभासाठी पात्र असलेल्या शेतकर्यांना सिंचन विहीरींचा लाभ आ.कुणाल पाटील यांच्या प्रयत्नांमुळे मिळणार आहे. त्यामुळे शेतकर्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

आ.पाटील यांच्या कार्यालयात पंचायत समिती गटविकास अधिकारी तसेच भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा जि.प.धुळे यांच्या बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या बैठकीत सिंचन विहीरींच्या योजनेबाबत आढावा घेतला. भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अहवालानुसार जमीनीत पाण्याची कमतरता असल्याने धुळे तालुक्यातील ५७ गावे महाराष्ट्र ग्रामीण राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीरींच्या लाभातून वगळण्यात आली होती.छाननी करतांना भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा जिल्हा परिषद,धुळे यांनी धुळे तालुक्यातील ५७ गावांचा प्रतिकूल अहवाल दिल्याने या छाननी प्रक्रीयेतून ही गावे वगळण्यात आली होती. त्यामुळे या ५७ गावांतील १००८ प्रस्ताव बाजूला ठेवण्यात आल्याने या गावातील एकही शेतकर्याला सिंचन विहीर मंजुर होणार नव्हती म्हणून या गावतील कार्यकर्ते आणि शेतकर्यांनी या ५७ गावांनाही सिंचन विहीरींचा लाभ मिळावा अशी मागणी केल्याने आ.कुणाल पाटील यांनी गेल्या महिन्यात बैठक घेतली होती. त्या बैठकित वगळण्यात आलेल्या गावांचा पुर्नसर्व्हेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुर्नसर्व्हेक्षण करुन भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी विभागीय कार्यालयात अहवाल सादर केला होता.त्यानुसार त्या गावातून आलेल्या सिंचन विहीरींच्या प्रस्तावाची छाननी करुन पात्र लाभार्थ्याचे स्थळ निरीक्षण केले जाणार आहे.त्यामुळे आता धुळे तालुक्यातील सर्व गावातील पात्र लाभार्थ्यांना सिंचन विहीरींचा लाभ मिळणार असल्याने शेतकर्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी झालेल्या बैठकीला आ.कुणाल पाटील यांच्यासोबत गटविकास अधिकारी गणेश चौधरी,सहाय्यक गटविकास अधिकारी रावसाहेब वाघ, भूजल सर्व्हेक्षक ललित ब्रिजलाल वाईकर,बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील,माजी सभापती गुलाबराव कोतेकर, खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील, उपसभापती योगेश पाटील संचालक साहेबराव खैरनार,माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील, संचालक एन.डी.पाटील, संचालक कुणाल पाटील,हर्षल साळुंके, माजी संचालक माधवराव पाटील आदी उपस्थित होते.

# रात्रीच्या बसेस बाय पास न जाता बसस्थानकात याव्यात

**चिमठाणे सह परिसरातील नागरिकांची मागणी**

**चौकशी ऑफिसची वेळ वाढवण्यात यावी**

**चिमठाणे । प्रमोद शिंपी**




चिमठाणे येथील बस स्थानक हे तालुक्यातच नव्हे तर धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मोठे बसस्थानक म्हणून ओळख जात असते. या बसस्थानकात गुजरात, मध्य प्रदेश, सह महाराष्ट्रात नाशिक, पुणे, मुंबई जाण्या साठी बसेस आहेत.परंतु मागील काही महिन्या पूर्वी देखील दै.लक्ष महाराष्ट्र ने बातमी प्रसारीत केली होती.व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देखील आगार प्रमुखांना निवेदन दिले होते.

बस मध्ये महिला प्रवासी किंवा दवाखाण्याचे पेशंट असो त्यांना बायपास चौफुली वर उतरावे लागते.येवडे मोठे बस स्थानक असून जर बसस्थानकात बस येत नसल्याने प्रवासांसह विद्यार्थ्यांनाही मन:स्ताप सहन करावा लागत आहे. मात्र बस स्थानकात बस फक्त संध्याकाळी पाच वाजेपर्यंत बस स्थानकात येतात. सहा वाजे नंतर बऱ्याच बस ह्या बाय पास जातात असतात. प्रवासी मात्र बस स्थानकात वाट पाहत बसलेले असतात. बस येत नाही म्हणून प्रवासी परत बाय पास चौफुली वर जातात. यामुळे नागरिकांची तरबळ होते त्यात महिला व लहान मुलांना त्रास सहन करावा लागतो. तसेच बस स्थानकाचे चौकशी ऑफिस देखील पाच नंतर बंद असते. ऑफिस वेळ ही आठ वाजेपर्यंत करण्यात यावी व संध्याकाळ नंतर बाय पास जाणाऱ्या नाशिक, पुणे ,मुंबई या सर्व बसेस रात्री बाय पास नं जाता बस स्थानकात याव्या अशी चिमठाणे परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# धुळे शहरात संताजी महाराज जयंती उत्सवानिमित्त आज विविध कार्यक्रम

**धुळे । प्रतिनिधी**




महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभाच्या वतीने श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची ३९९ वी जयंती दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी मोठया उत्साह व जल्लोषात साजरी करण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभा प्रदेशाध्यक्ष खासदार रामदास तडस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, विरोधी पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार, कार्याध्यक्ष अशोक काका व्यवहारे, कोषाध्यक्ष गजानन नाना शेलार, प्रदेश महासचिव डॉ. भूषण कर्डिले, सेवा आघाडी अध्यक्ष सुभाष पन्हाळे, राज्य समन्वयक सुनिल चौधरी, प्रदेश युवा महासचिव नरेंद्र चौधरी मार्गदर्शनाने संपूर्ण राज्यात करण्यात आले आहे. संपूर्ण राज्यात विविध धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शासकीय, निम शासकीय कार्यालयांत देखील महाराजांची जयंती साजरी करण्याबाबत जागृती करण्यात आली. सकाळी १०.३० वाजता गुरु शिष्य स्मारक येथे महाआरती व प्रतिमा पुजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा महिला आघाडीच्या वतीने सकाळी ११.०० वाजता कुष्ठरोग आश्रमात पुरुषांना टी शर्ट व महिलांना साडी वाटप करण्यात येणार आहे. निराधार व अंध शाळेत प्रांतिक तैलिक महासभा जिल्हा उपाध्यक्ष पप्पुशेठ अहिरराव यांच्या माध्यमातून अन्नदान करण्यात येणार आहे. तसेच सकाळी ११ वाजेपासून दुपारी २ वाजेपावेतो एकविरा देवी मंदीर परिसरात मोफत अन्नदानचा कार्यक्रम युवा आघाडीचे पंकज चौधरी यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता वाडीभोकर येथे प्रतिमा पुजन कार्यक्रम करण्यात येणार असून सेवा आघाडीच्या वतीने पांझरा पोळ गोशाला येथे दुपारी १२.३० वाजता चारा वाटप सेवा आघाडी शहर अध्यक्ष किशोर थोरात यांच्या सहकार्याने होणार तर रात्री ८ वाजता महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा जिल्हाध्यक्ष कैलास काळू चौधरी यांच्या सहकार्यातून बसस्टॉप, रेल्वेस्टेशन येथे व विविध मंदीर भागात निराधार व भिक्षूक लोकांना ब्लॅकेटचे वाटप असून सदर सर्व कार्यक्रमाना समाज बांधवांनी व सर्व सन्माननीय पदाधिकारी यांनी सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन पदाधिकारींनी केले आहे.

# खंबाळे येथे नवीन मतदार नोंदणी बाबत मार्गदर्शन



**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खंबाळे येथे आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नवीन मतदार नोंदणी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

१८ वर्षापुढील विद्यार्थ्यांना नवीन मतदार नोंदणी कशी करावी व त्यासाठी कोणत्या कोणत्या कागदपत्राची आवश्यकता असते याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी शिरपूर पं. स. शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. निता सोनवणे, ऋषीकेश कोळी (केंद्रप्रमुख आंबे), निलेश पवार (बी.एल.ओ. खंबाळे), प्राचार्य आर.एन.पवार उपस्थित होते. ११ वी १२ वी चे सर्व विद्यार्थी सुद्धा उपस्थित होते.

शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. निता सोनवणे यांनी सांगितले की, मतदार म्हणून आपला हक्क बजावण्यासाठी आपले नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे. त्यासाठी १८ वर्ष पूर्ण झालेल्यानी आपली नावे मतदार यादीत आपल्या भागातील बी.एल.ओ. कडून नोंदवून घ्यावे.कार्यक्रम यशस्वितेसाठी एम.आय.मुसलमान, व्ही. एस.बेलदार, एस.डी.पाटील, डी.ए.पावरा, आर.यु.पवार, आर.एल.तवर, पी.बी.वाघ, व्ही.एन.दोरीक, एम.जी.अहिरे, ए.बी.महाजन यांनी प्रयत्न केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या शैक्षणिक मुलमंत्राचा स्वीकार करा : प्रा. मोरे

**धुळे । प्रतिनिधी**



येथील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. या आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगतातून बोलताना जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट चे संचालक प्रा. मोहन मोरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखेच शिक्षणाला अधिकाधिक महत्त्व दिले पाहिजे.

अंधश्रद्धेपासून दूर राहावे, परिश्रम करावेत. बाबासाहेब आंबेडकर यांनी भगवान बुद्ध, संत कबीर, म. फुले यांना केवळ वाचून आपले गुरुस्थानी मानले होते, तिनही गुरुंनी लिहिलेली साहित्य संपदा आपल्या कार्यकृतीत आणली. भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना आनंदाने व सुरक्षित जगता यावे यासाठी राज्यघटनेची निर्मिती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखेच चारित्र्यवान होणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल असे सांगितले. विद्यार्थी वक्त्यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विद्यालयातील पर्यवेक्षिका सौ. एम्. व्ही. पिंपळीसकर यांनी डॉ. बाबासाहेब यांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्य याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन सामुदायिक बुद्धवंदना घेण्यात आली. याप्रसंगी जयहिंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय पितांबर पाटील, सचिव शरद बच्छाव, संचालक भूषण सावंत, मुख्याध्यापक शिवाजी बैसाणे, पर्यवेक्षक मोरे, व्ही. टी. गवळे, सौ. मीना पिंपळीसकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे असे सूत्रसंचालन श्रीमती निकुंभे, यांनी केले तर आभारप्रदर्शन व्ही. एन. सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ए. के. तावडे. सौ. एस्. एम. देसले, सौ. प्रज्ञा बोरसे, जे. आर वाघ, एस.यु. पावरा, दर्शन पाटील, किरण पाटील, विकी वाडेकर आदींनी परिश्रम घेतले.

# यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी




**धुळे । प्रतिनिधी**

विद्याधन महाविद्यालय वलवाडी,धुळे येथील महाविद्यालयात आपल्या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा पुण्यस्मरण दिवस साजरी करण्यात आला.

सदर कार्यक्रमास म्हसदी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रमेश अहिरे,यांनी विचार मांडतांना म्हटले की यशवंतराव चव्हाण यांचे कार्य हे संपूर्ण राज्याला प्रेरणादायी आहे. त्यांच्या नावाने विद्यापीठाची स्थापना करून वंचितांना शिक्षण ही मोठी संधी उपलब्ध करून दिली.सोनगीर महाविद्यालयाचे प्रा.अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.त्यात म्हणाले की यशवंतराव चव्हाण यांनी शेतकऱ्यांसाठी श्र्वेतक्रांतीची निर्मिती करून शेतकरी व कष्टकरी वर्गाला देखील जीवन जगण्यासाठीचा मार्ग निर्माण करून दिला, कार्यक्रमास प्राचार्य डॉ.आर.बी.पवार, संस्थेचे सचिव तथा मुक्तविद्यापीठ अभ्यास केंद्र संयोजक श्री.हर्षल पाटील,विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.योगेश बोरसे,करियर कट्टा प्रमुख प्रा.भूषण पाटील,मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र प्रमुख प्रा. जागृती पाटील,राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.ललिता निकम,सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ध्रुवनगरला टोळक्याने फोडली ३ वाहने

**नाशिक ।** सातपूरच्या ध्रुवनगरमध्येही खंडोबा महाराज मंदिर परिसरात रविवारी (दि. ३) अज्ञात ४ टवाळखोरांनी तीन वाहनांची तोडफोड केली. हे चौघेही सीसीटीव्हीमध्ये कैद झाले असून त्यांचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभाष जाधव यांच्या घरासमोरील पार्किंगमध्ये उभ्या स्विफ्ट कार (एमएच ०२ सीडब्ल्यू ८९२), याच ठिकाणी उभ्या गिरीश तिलनकर यांच्या कार (एमएच ४१ व्ही ५२६१), ध्रुवनगर पाण्याच्या टाकीमागे अशोक काळे यांची स्कूल व्हॅन (एमएच १५ एफव्ही ७०६५) या वाहनांच्या दोन्ही काचा फोडल्या. तर याच परिसरातील एका भाजी विक्रीच्या दुकानाचीही तोडफोड करत दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. गंगापूर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्रीकांत निंबाळकर यांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. यात एक माथेफिरू निदर्शनास आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. त्यानुसार गंगापूर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. परिसरात गस्त वाढविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# हस्ती बँकेच्या वर्धापनदिन निमित्ताने रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**धुळे । प्रतिनिधी**



हस्ती बँकेच्या दोंडाईचा येथील मुख्य शाखेच्या ५२ व्या वर्धापनदिन निमित्ताने मुख्य शाखेत हस्ती बँकेचे प्रमुख मदन भाऊ जैन, अध्यक्ष कैलास जैन यांचा मार्गदर्शन खाली रक्तदान शिबीर, नेत्र चिकित्सा शिबीर, ग्राहक मेळावा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जेष्ठ संचालक पहलाजजी माखिजा, बोर्ड ऑफ मैनेजमेंट चे चेयरमैन किशोर जैन व अनील मराठे यांनी रक्तदान शिबीराचे उद्घाटन केले. या पावन प्रसंगी सत्यनारायण भगवान ची पूजा संजय दुगड यांनी सपत्नी केली. या प्रसंगी अशोक भाऊ जैन, विजय पाटील, तज्ञ संचालक प्रकाश कुचेरीया, भंवरलाल जैन, हिरालाल मारवाडी, मधुबाला जैन, प्रा.मंजुषा पाटील, प्रदीप जैन , मुख्य व्यवस्थापक सतिष जैन, दिलीपबापू पाटील, शकील खाटीक, व्ही.एम पाटील, सुनील गर्गे आदी मान्यवर उपस्थित होते. हस्ती बँकेच्या वर्धापनदिन निमित्ताने झालेल्या रक्तदान शिबिरात ४२६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्यास बँकेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली.ग्राहक मेळाव्यात ४५० ते ५०० शहर व परिसरातील व्यापारी ग्राहकांची उपस्थिती होती. यावेळी माजीमंत्री डॉ हेमंतराव देशमुख, माजी नगराध्यक्ष बापूसाहेब देशमुख, धुळे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्र्वर भामरे, भायासेठ वाणी, नगरसेवक, पत्रकार बंधु, सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.रक्तदान शिबीरासाठी नवजीवन रक्तपेढी, निर्णय रक्तपेढी धुळे जनकल्याण रक्तपेढी नंदुरबार तर नेत्र चिकीत्सा शिबीरासाठी नंदुरबार येथील कांता लक्ष्मी रुग्णालयाचे सहकार्य लाभले. शिबीर यशस्वी करण्यासाठी सुनिता शर्मा, कपील अग्रवाल यांच्या सह मुख्य शाखेचे व्यवस्थापक सर्व अधिकारी कर्मचारी वृंद यांनी परीश्रम घेतले.

# तालुकास्तरिय खो-खो स्पर्धेत नुतन मराठा विद्यालय व सि.डी.देवरे विद्यालयाचा संघ विजयी

**साक्री । प्रतिनिधी**



महाराष्ट्र खो-खो असोसीएशनची सन २०२३-२४ सालची कुमार-मुली (१८ वर्षाखालील) विभाग यांची ४९ वी राज्यस्तरीय अजिंक्यपद व निवडचाचणी खो-खो स्पर्धा १८ ते २१ डिसेंबर या कालवधीत शहादा येथे होणार आहे. साक्री तालुका खो-खो असोसिएशन यांच्या वतीने कुमार-मुली (१८ वर्षातील) अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २०२३-२४. दि. ०७ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता तालुका क्रीडा संकुल येथील मैदानावर आयोजित करण्यात आलेली होती.

स्पर्धेचे उद्घाटन श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल,म्हसदी येथील जेष्ठ क्रीडा शिक्षक मा.श्री.किशोर शिंदे सर,जेष्ठ क्रीडा शिक्षक श्री. मुनंद करंजे, श्री. एस.डी. देवरे सर यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे मा.श्री. एस.यु.साळुंके,श्री.अभिजित सोनवणे श्री.विनोद भदाणे,श्री.दयानंद बोरसे, श्री. राकेश सूर्यवंशी तसेच साक्री तालुका खो खो असोसीएशनचे सचिव श्री.प्रसाद देसले, उपाध्यक्ष श्री.महेश मराठे, कोषाध्यक्ष श्री.अनिल पाटील, सदस्य श्री.अशोक सोनवणे,श्री.राकेश मोरे, श्री.अर्जुन राऊत, श्री.वैभव सोनवणे, श्री.अमोल अहिरे,श्री. राजकुमार देवरे उपस्थित होते. साक्री तालुक्यातील श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल म्हसदी, सि.डी.देवरे माध्यमिक विद्यालय म्हसदी , नूतन मराठा विद्या मंदिर छड्वेल कोरडे, इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय, पिंपळनेर, न्यू इंग्लिश स्कूल, साक्री येथील संघ सहभागी झाले होते. कुमार गटात सि.डी.देवरे माध्यमिक विद्यालय म्हसदी येथील संघ विजयी झाला. मुलींच्या गटात नुतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील संघ विजयी झाला. तालुकास्तरिय खो-खो स्पर्धतून किशोर-मुली गटातील संघ दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी तालुका क्रीडा संकुल साक्री येथे होणाऱ्या धुळे जिल्हास्तरीय अजिंक्यपद व निवड चाचणीत स्पर्धेत सहभागी होईल. राज्यस्तरीय पंच श्री. महेश भवरे, अर्जुन राऊत यांनी स्पर्धेत पंच म्हणून काम पहिले .वेळ अधिकारी म्हणून श्री.अमोल ठाकरे व श्री.जगन माळीच यांनी काम पाहिले.स्पर्धा यशस्वी आयोजनासाठी धुळे जिल्हा खो-खो असोसिएशनचे सहसचिव श्री. धनंजय सोनवणे, यशपाल देसले,मंगळू माळचे यांनी काम पाहिले.

# नाशिक जिल्ह्यात गुटखा विरोधी अभियानात ५५६ छापे

**नागरिकांची मागणी**

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक ग्रामीण पोलिसांकडून गुटखा विरोधी अभियान महिनाभरापासून सुरू असून आतापर्यंत ५५६ ठिकाणी छापे टाकून दोन कोटी, १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ग्रामीण पोलिसांकडून जिल्ह्यातील गुटखा विक्रीला पायबंद घालण्यासाठी यापूर्वी चार वेळा अभियान राबविण्यात आले आहे. सहा नोव्हेंबरपासून नव्याने अभियानाला सुरुवात करण्यात आली. अभियानादरम्यान विशेष पथकाने केलेल्या कारवाईत परराज्यातील एका मालवाहतूक वाहनाव्दारे चांदवड शहरातून मुंबई-आग्रा महामार्गाने मुंबईच्या दिशेने ५० लाखांचा गुटखा नेण्यात येत असताना जप्त करण्यात आला. या कारवाईत दोन संशयितांना अटक करून सुमारे ७० लाख ८,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. महिनाभरात ५५६ गुन्हे दाखल करुन ७५४ संशयितांना अटक करण्यात आली आहे.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
शुक्रवार दि. ८ डिसेंबर २०२३





# धुळे महानगरपालिकेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा मोर्चा

## जनतेसाठी आंदोलनकरणारच :इर्शाद जहागीरदार



















धुळे । महापालिकेने धुळेकर नागरिकांना वाढीव घरपट्टी आकारण्याचा सपाटा लावला आहे. वाढीव कराच्या नोटीस हातात पडल्यानंतर धुळेकरांच्या पायाखालची वाळू सरकत आहे. शहरात सोयी-सुविधांची बोंब असताना मनपा अवाजवी कर आकारतेच कशी? असा संतप्त सवाल धुळेकरांमधून उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागीरदार यांच्या मार्गदर्शनातव जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी यांच्या नेतृत्वात धुळे महापालिकेवर धडक मोर्चा काढण्यात आला. वाढीव घरपट्टी रद्द झालीच पाहिजे, अशी आग्रही मागणी या मोर्चाद्वारे करण्यात आली. तसेच मनपाने वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस मागे न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला. दरम्यान, धुळेकरांच्या बाजुने राष्ट्रवादी काँग्रेस मैदानात उतरल्याने धुळेकरांमधून इर्शादभाईसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या आक्रमक भुमिकेचे कौतुक होत आहे. यावेळी प्रदेश सरचिटणीस इर्शादभाई जहागीदार, जिल्हाध्यक्ष कैलास चौधरी व पदाधिकार्यांनी मनपा आयुक्त अमिता दगडे-पाटील यांची दालनात भेट घेवून निवेदन दिले. तसेच मनपाकडून धुळेकरांवर होत असलेल्या अन्यायाबाबत चर्चा केली. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील नागरिकांना महापालिकेने वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस बजावण्याचा सपाटा लावला आहे. शहरातील नागरिकांना मुलभूत नागरी सुविधा अर्थात पाणी, लाईट, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण रस्ते यापासून वंचित ठेवण्यात आले आहे. नागरिकांचे पिण्याचे पाणी आठ-आठ दिवस मिळत नाही. बंद पथदिव्यांमुळे अनेक भागात अंधाराचे साम्राज्य असते. मनपा शाळा मोडकळीस आल्या आहेत. कचरा संकलन करणार्या गाड्याही नियमित येत नाहीत. या प्रश्नांकडे मनपाने सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहेत. शहरातील एकही रस्ता चालण्यायोग्य नाही. कचर्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय मनपाच्या दवाखान्यांमध्ये डॉक्टर व कर्मचार्यांअभावी आरोग्य व्यवस्था ढासळली आहे. मनपाच्या अशा कारभारावर धुळेकर जनता अगोदरच प्रचंड नाराज आहे. असे असताना मनपाने आता वाढीव मालमत्ता कर आकारुन कहर केला आहे. मनपाचा हा प्रकार म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्यासाखा आहे.

संकलन : दिपक वाघ

CMYK
दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# पाचकंदील भागातील चारही जुने मार्केट तोडून नवे बांधणार

## धुळे मनपाच्या महासभेत मंजुरी













धुळे।
शहरातील पाचकंदील भागात मनपाचे लालबहादूर शास्त्री मार्केट आहे. ते पाडून नवे मार्केट बांधण्याचे कार्यादेश मनपाने दिले होते. पण व्यापाऱ्यांनी जुन्या मार्केटचा ताबा न सोडल्याने नवीन मार्केट झाले नाही. दरम्यानच्या काळात विकासकाने मनपावर ३० कोटींचा दावा दाखल केला. या दाव्याच्या विरोधात काउंटर क्लेम दाखल करण्यासह पाचकंदील परिसरातील मनपाचे जुने चारही मार्केट पाडून या ठिकाणी नवीन मार्केट बांधण्यास महासभेत मंजुरी देण्यात आली. महापालिका सभागृहात मंगळवारी सकाळी ही सभा झाली. महापौर प्रतिभा चौधरी, आयुक्त अमिता दगडे-पाटील, उपमहापौर वैशाली वराडे, नगरसचिव मनोज वाघ उपस्थित होते. मनपाचे पाचकंदील लालबहादूर शास्त्री मार्केट असून या ठिकाणी नवे मार्केट बांधण्याचे कार्यादेश मनपाने दिले होते. पण हे काम झाले नाही. त्यामुळे विकासकाने मनपावर ३० कोटींचा दावा दाखल केला. या विषयावर महासभेत चर्चा झाली.

संकलन : दिपक वाघ